# जळगांव जिल्हा

## जिल्हयाचा इतिहास :

महाभारताच्या भिष्मपर्वात विविध प्रदेशांचा गोमती, मंदका, खंडा, विदर्भा व रूपवाहिका असा उल्लेख आढळतो. त्यातील खंडा म्हणजे खानदेश असाही अर्थ पाश्चात्य इतिहासकारांनी लावला आहे. गुंजरात सुलतान पहिला अहमद यानेे या प्रदेशातील दुंसरा फारूकी राजा मलीक याला खान ही पदवी बहाल केली होती व त्यावरून खानदेश नाव पडले होते. थोडक्यात हल्लीच्या धुळे व जळगांव या दोन्ही जिल्हयांचा प्रदेश मध्ययुगीन काळापासून खानदेश या नावाने ओळखला जात असे. तथापि प्रशासनाच्या दृष्टीने १९०६ मध्ये खानदेशचे पुर्व खानदेश व पश्चिम खानदेश असे दोन जिल्हयात विभाजन करण्यात आले. जळगाव मुख्यालय असलेला १० तालुके व ३ पेठयांचा मिळून पुर्व खानदेश जिल्हा होता. १९१७ मध्ये पारोळा पेठा व त्यानंतर भडगाव व एदलाबाद आताचा मुक्ताईनगर या पेठयांना तहसिलांचा दर्जा देण्यात आला.

१९५० मध्ये चाळीसगाव तहसिलमधील १३ गावे औरंगाबाद जिल्हयात वर्ग करण्यात आली. १९५६ मधील राज्य पुर्नरचनेत मुंबई राज्यात समाविष्ठ असलेला पुर्व खानदेश हा जिल्हा १९६० मध्ये स्थापन झालेल्या महाराष्ट्र राज्याचा एक जिल्हा म्हणून राहीला. दिनांक १०.१०.१९६० पासून महाराष्ट्र शासनाने नावात बदल केल्याने पुर्व खानदेश ऐवजी जळगांव जिल्हा या नावाने हा जिल्हा ओळखला जावू लागला.

महाराष्ट्र शासनाच्या महसुल व वनविभागाच्या २३ जुन १९९९ च्या अधिसुचनेनुसार भुसावळ आणि एरंडोल तालुक्याचे विभाजन करून अनुक्रमे बोदवड आणि धरणगाव हे दोन नवीन तालुके निर्माण करण्यात आले आहे. त्यामुळे जळगांव जिल्हयात २३ जुन १९९९ पासून १३ ऐवजी १५ तालुके आहेत.

## भौगोलीक रचना :

पुर्वी पुर्व खानदेश म्हणून ओळखला जाणारा जळगाव जिल्हा तापी नदीच्या मध्य खो-यात महाराष्ट्र राज्याच्या वायव्य पुर्वेस २० अंश ते २१ अंश उत्तर अंक्षाश व ७४.५५ अंश ते ७६.२८ अंश पुर्व रेखांश या दरम्यान हा जिल्हा पसरलेला आहे.जळगाव जिल्हयाच्या उत्तरेस व ई शान्येस मध्यप्रदेश या राज्याच्या सीमा भिडतात. आग्नेय दिशेस बुलढाणा, दक्षिणेस औरंगा बाद, नैऋत्येस नाशिक जिल्हा तर पश्चिम वायव्येस धुळे जिल्हा या जिल्हयांच्या सीमा आहेत.

जळगांव जिल्हा दखखनच्या पठाराचा एक भाग असून विविधतेने नटलेला आहे. डोंगराळ व वनक्षेत्राचा समावेश असलेला तापी खो-याचा सधन व सपाट पटटा जलसिंचनास वाव असलेला आहे. मध्यभागी सधन तापी खो-याचा पटटा, उत्तरेस जंगलव्याप्त असा उंच सातपुडयाचा भाग आणि दक्षिणेस व नैऋत्येस टेकडयांचा व जलसिंचन सोयी असलेला अजिंठा पर्वतराजींच्या भागात विभागला आहे. जळगांव जिल्हयाच्या उत्तरेस सातपुडा, नैऋत्येस हटटी व दक्षिणेस अजिंठा अशा तीन पर्वतराजी पसरलेल्या आहेत. सातपुडा पर्वताच्या मध्यभागात ६५० ते ७०० मीटर व काही शिखरांची उंची ९०० मीटरपर्यंत आहे. हटटी पर्वतराजी १२५० मीटर पर्यंत व सातमाळा पर्वतराजीत उतरत्या श्रेणीत १८० मीटरपर्यत उंची आहे. जिल्हयाची मुख्य नदी तापी ही पुर्वेकडून पश्चिमेकडे वाहते. जिल्हयाचा मध्यभाग हा तापी खो-याचा सुपिक प्रदेश असून त्याच्या उत्तरेस उंच व

विस्तिर्ण सातपुडा पर्वतराजी व नैऋत्य दिशेस अजिंठा पर्वताच्या रांगा आहेत. जिल्हयातील विविध ठिकाणची समुद्रसपाटीपासूनची उंची १७५ ते ३२५ मीटर दरम्यान आहे.

जळगांव जिल्हयाचे हवामान सर्वसाधारणपणे पावसाळा वगळता कोरडे असते. जिल्हयात साधारण: डिसेंबर महिन्यात तापमान कमी असते तर मे महिन्यात सर्वाधीक तापमान असते. जिल्हयातील जमिनीचे वर्गीकरण सुपिक, काळीभोर, मध्यम काळी, जंगलक्षेत्र मुरूम व रेताड असे ढोबळ मानाने करता येईल.

### धार्मीक स्थळे :

चाळीसगांव जवळ पाटणादेवीचे मंदीर आहे. मुक्ताईनगर तालुक्यात चांगदेव येथे तापी व पुर्णा नदीचा संगम असून तेथे चांगदेव देवस्थान आहे. मुक्ताबाईचे देवस्थान कोथळी येथे आहे. एरंडोल जवळ पदमालय येथे गणपतीचे पुरातन मंदीर आहे. फरकांडे येथे ऐतिहासिक झुलते मनोरे आहेत. चोपडा जालुक्यात उनपदेव येथे गरम पाण्याचे झरे आहेत. अमळनेर तालुक्यात तापी, गिरणा व अंजनी नदीच्या संगमावर रामेश्वर येथे महादेवाचे पुरातन मंदीर आहे. वैशाख महिन्यात अमळनेर येथे श्री. संत सखाराम महाराज यांची यात्रा भरते. अमळनेर येथे गांधी तत्वज्ञान केंद्र आहे. रावेर तालुक्यात पाल हे प्रसिध्द थंड हवेचे ठिकाण सातपुडा पर्वताच्या एका पठारावर वसलेले निसर्गरम्य पर्यटन स्थळ आहे. तेथे वनक्षेत्र कर्मचा-यांसाठी प्रशिक्षण केंद्र आहे. स्थळनिहाय माहिती पुढीलप्रमाणे आहे.

## ❖ जळगांव जिल्हयातील पर्यटन स्थळाची थोडक्यात माहिती :

### ♦ उनपदेव ता. चोपडा :

उन-अप म्हणजे गरम पाणी. खानदेशातील भाषेत वुना देव म्हणजे ज्याने हे उष्ण पाणी निर्माण केले तो देव. उनपदेव हे जळगांव जिल्हयातील चोपडा तालुक्यातील अडावद गावाच्या शिवारात सातपुडा पर्वताच्या पायथ्याशी आहे. सदर ठिकाण अनादी काळापासून गणेश उपासक व साधुसंताचे धार्मीक स्थळ म्हणून प्रसिध्द आहे. सदर ठिकाण जळगाव शहराच्या उत्तरेस ८० किमी व चोपडा गावाच्या पुर्वेस २० किमी अंतरावर आहे. या ठिकाणी नैसर्गिक उष्ण पाण्याचे अखंड झरे असून पाणी एका गोमुखाव्दारे पडून प्राचीन काळात बांधलेल्या कुंडातून सतत वाहते. या पाण्याचे सर्वसाधारण उष्णतामान ६० ते ७० अंश सेल्सीयस इतके आहे. उष्ण पाण्यात स्नान केल्याने चर्मरोगाचे निवारण होते अशी भावीकांची श्रध्दा आहे. त्यामुळे सर्व धर्माचे लोक व पर्यटक वर्षभर येथे येत असतात व स्नानाचा लाभ घेतात. याबददलचा सर्व इतिहास श्रीराम चरीतमानस ग्रंथ व वाल्मिकी रामायणात आलेला आहे. शरभंग ऋषींकरीता या पाण्याची निर्मिती प्रभुरामचंद्रानी केली होती. शरभंग ऋषींचे शरीर दुंर्गधीयुक्त होते व त्यास छिद्रे पडली होती. प्रभू श्रीरामचंद्र, लक्ष्मण व सीता वनवासात भ्रमण करत करत शरभंग ऋषींच्या आश्रमात आले तेव्हा शरभंग ऋषींनी श्रीराम यांची पुजा केली व श्रीरामाकडून वर मागीतला. तेव्हा प्रभू श्रीरामचंद्रांनी अग्नीबाण मारून उष्ण पाण्याची निर्मिती केली. शरभंग ऋषींनी त्या पाण्यात आंघोळ केली व त्यांना दिव्य शरीर प्राप्त झाले. झ-याच्या भोवती सुसज्ज तलाव व धर्मशाळा आहे.पौष महिन्यात या ठिकाणी महिनाभर यात्रा असते. उष्ण पाण्यात स्नान करण्यासाठी व निसर्गरम्य वनसृष्टीचा आनंद लुटण्यासाठी मोठया प्रमाणात लांबलांबचे पर्यटक भेटी देत असतात.

## ♦ पदमालय ता. एरंडोल :

पदमालय हे एरंडोल तालुक्यात एरंडोल पासून ११ किमी अंतरावर व जळगाव जिल्हयाच्या मुख्यालयापासून ५० किमी अंतरावर वसलेले आहे. या तिर्थक्षेत्री अतिप्राचीन व दुर्मिळ असे डावी व उजवी सोंड असलेल्या गणेशाचे मंदीर आहे. मंदीराचा परीसर नयनरम्य असून मंदीराच्या समोरच मोठा तलाव आहे. या तलावात विविध छठा असलेल्या कमळाची फुले उमलतात. या परीसरात जिर्णावस्थेत असलेली एक धर्मशाळा आहे. प्रत्येक संकष्ट चतुर्थीस व अंगारकी चतुर्थीस विविध जिल्हयातून मोठया प्रमाणात गणेश भक्त या पावन तिर्थस्थळी गणेशाच्या दर्शनार्थ भेटीस येतात. श्रीगणेश पुराणात उपासना खंडातील चार अध्यायात श्रीक्षेत्र पदमालयातील मुर्तीचा उल्लेख आहे. या मुर्ती स्वयंभू असल्याची श्रध्दा आहे. या संस्थानाला माधवराव पेशवे यांची सनद दिली होती. एकाच पीठावर एक उजव्या सोंडेचा व दुसरा डाव्या सोंडेचा अशा स्वयंभू प्रवाळयुक्त श्रीगजाननाच्या मुर्ती येथेच पाहावयास मिळतात. पदमालयापासून दोन किमी अंतरावर भीमकुंड आहे. येथे भीमाने बकासुराचा वध केल्याचे म्हटले जाते. पदमालय पर्यटनस्थळाच्या विकासासाठी तरतुद उपलब्ध झालेली नसल्याने आजतागायत हे पर्यटनस्थळ विकासापासून वंचीत राहीलेले आहे

## ♦ पाल ता. रावेर :

रावेर तालुकयात पाल हे प्रसिध्द थंड हवेचे ठिकाण सातपुडा पर्वताच्या एका पठारावर वसलेले निसर्गरम्य पर्यटनस्थळ रावेरच्या २२.४ किमी पश्चिमेस आहे. आदिवासींसाठी निर्माण केलेले सातपुडा विकास मंडळ व आदिवासी आश्रमशाळा येथे कार्यरत आहे. पाल येथील जुन्या किल्ल्याचे बुरूज , तट व इतर अवशेष या स्थळाची प्राचीनता दर्शवतात. आभीर अधिपतींचे राज्य असतांना येथे त्यांचे स्थानिक मुख्यालय होते. पुढे राज्यावर आलेल्या फारूकीचे देखील येथे ठाणे असावे. काही अभ्यासकांच्या मते हत्तीवाडा म्हणजे सुरक्षित बंदीस्त बाजारपेठ असावी. यासारखी बाजारपेठ रायगडावर आहे. परंतु रायगडावरील बाजारपेठ इतकी बंदीस्त नाही. दिल्लीचा सुलतान मुहम्मद तुघलकाने आपली राजधानी दिल्लीहून दौलताबादला स्थानांतरीत करतांना पालच्या मैदानी भागावर विश्रांतीसाठी मुक्काम केला होता. त्याप्रसंगी जीर्णोध्दार केलेली मशीद बांधल्याची शक्यता वाटते. ब्रिटीश राजवट आली तेव्हा पाल पुर्णत : निर्जन असून जंगली श्वापदांचा सुळसुळाट होता. पालच्या जुन्या मशिदीच्या प्रवेशव्दारावर राजेशाही कमान आहे. मशीद ८.१ मी. लांब व तेवढीच रूंद असून काळया दगडात बांधलेली आहे. परंतु चुन्याचा वापर केलेला नाही. मशीदीसमोरील खांब ढासळले असले तरी मुळ वास्तु सुस्थितीत आहे. मशिदीमागे ६० मी लांब व तेवढयाच रूंदीचा हत्तीवाडा आहे. काही जण यास हत्ती बांधण्याची जागा संबोधत असले तरी ती बाजारहाटाची बंदीस्त सुरक्षित जागा असावी. हत्तीवरून येथे बाजारहाट करता येत असावा. मशिदीपासून किल्ल्याकडे फरसबंदी मार्ग होता. किल्ल्यातून फरसबंदी मार्गाने सुकी नदीकाठच्या नागझरीजवळ उतरता येते. येथे दाट झाडी असून नागझरी कुंडात गोड पाणी पडते. या ९ मी रूंद व १५ मी लांबीच्या जलाशयास किल्ल्यातील विहीरीतून झरे आहेत असे सांगतात. या जलशयाला १५ नागमुख असून त्यातून पाणी सुकी नदीत जाते.

गावाजवळील टेकडीवर पालोवा ऋषींचे स्मारक आहे. सन १९५६ मध्ये खोदकाम करतांना पुरातन काळातील दगडी बांधकामाची, सांडपाणी निच-याची व्यवस्था केलेली आढळली. महमंद तुघलक कालीन नाणीही सापडली आहे. पाल येथे आभीरराज कालीन पुरातन मोठया विटात बांधलेले महादेव मंदीर आढळले आहे. येथे ब-याच ठिकाणी गवळणीच्या मुर्ती सापडल्या आहेत. येथे वनक्षेत्र कर्मचा-यासाठी प्रशिक्षण केंद्र आहे.

## ♦ मनुदेवी ता. यावल :

श्रीमनुदेवीचा उल्लेख सप्तशतीपाठ या ग्रथांत मार्कण्डेय ऋषींनी केला आहे. या मंदीरात विष्णू, शंकर व पार्वती यांच्यादेखील मूर्ती आहेत. इ.स. १२५१ मध्ये या मंदीराचा शोध लागला. तेव्हाचा गवळी राजा ईश्वरसेन याने या हेमाडपंथी मंदीराची स्थापना केली. या मंदीराच्या आजुबाजुच्या परिसरात गवळी वाडयाचे अवशेष अजुनदेखील पाहावयास मिळतात. हे पवित्र जागृत स्थळ सातपुडयाच्या पायथ्याशी निसर्ग सौदर्याने नटलेले असून बाजुस रमणीय धबधबा वाहत असतो. पावसाळयात याची सुंदरता अधिकच मनमोहक असते. खानदेशातील ब-यांच लोकांचे कुलदैवत श्रीमनुदेवी आहे. मार्गशीर्ष महिन्यात , नवरात्रात व अष्टमीस येथे नवचंडीं यज्ञाचे आयोजन केले जाते. हे स्थान चोपडा यावल रस्त्यावर असून आडगाव फाटयापासून पुढे ५ किमी आहे.

## ♦ पाटणादेवी ता. चाळीसगाव :

पाटणादेवी येथील प्राचीन मंदीराची स्थापना शके ११२८ मध्ये झाली असून हे मंदीर हेमाडपंथी कलेचा उत्कृष्ट नमुना आहे. हे मंदीर यादवकालीन असून गौताळा अभयारण्यात येते. हे स्थान पार्वतीचे शक्तीपीठ असून याचा उल्लेख देवी भागवत मध्ये आहे. श्रीचंडीकामाता ब-याच जणांची कुलस्वामीनी असून या पवित्र जागृत स्थळाच्या दर्शनासाठी असंख्य भावीक येतात. प्रख्यात गणितज्ञ भास्कराचार्य यांचा जन्म पाटणचाच. त्यांचा येथे जोतीर्विदयेचा खुप मोठा आश्रम होता. भास्कराचार्यांना शुल्याचा शोध येथेच लागला असे म्हटले जाते. त्यांच्या यज्ञकुंडाचे अवशेष अजुनही पाहावयास मिळतात. मंदीराजवळील परिसर निसर्ग सौंदर्याने भरगच्च असून ३ किमी अंतरावर पितळखोरा लेणी आहे. धवलतीर्थ केदारकुंड असून दोन डोंगरी नदयांचा उगम येथे आहे. येथे जवळच वाल्मीकींची समाधी आहे. पाटणादेवी येथे प्रतिवर्षी चैत्र पौर्णिमेस मोठी यात्रा भरते. शारदीय नवरात्री उत्सवाचे वेळी यात्रा, भगवती महापुजा, होमहवन इत्यादी कार्यक्रम होतात. भावीकांची संख्या १० हजाराच्या आसपास असते. दैनिक येणा-या भावीकांची संख्या १०० पैक्षा जास्त आहे. चैत्र पौर्णिमा उत्सवाच्या वेळी भाविक हजारोच्या संख्येने येतात.

## ♦ श्रीक्षेत्र रामेश्वर मौजे पळसोद ता. जि. जळगांव:

रामेश्वर तिर्थस्थळ हे अंजनी, गिरणा व तापी या नदयांच्या त्रिवेणी संगमावर पुरातन काळी स्थापीत असलेले शिवलिंग मंदीर आहे. हे तिर्थस्थळ मौजे पळसोद ता.जि. जळगांव या जळगांवपासून ४५ किमी अंतर असलेले पळसोद गावाच्या शिवारात पळसोद गावापासून संगमाकडे २ किमी अंतरावर वसलेले आहे. संपुर्ण भारतात दोन शिवलिंग एकाच मंदीरात असलेले दोन ठिकाणापैकी हे एक ठिकाण आहे. दुसरे असे स्थळ तामीळनाडू राज्यातील रामेश्वरम येथे आहे. श्रीक्षेत्र रामेश्वर येथे त्रेतायुगकालीन शिवमंदीर आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे या शिवमंदीरात दोन शिवलिंग असून त्यातील एकाची स्थापना स्वंयं प्रभू श्रीरामचंद्र व सीता यांचे हस्ते व दुसरे शिवलिंग श्री. लक्ष्मण यांच्या हस्ते स्थापन झाले आहे. हे मंदीर दक्षिणेतील रामेश्वरापेक्षा आधी स्थापन झाले असून दक्षिणेतील रामेश्वर फक्त प्रभू श्रीरामचंद्र यांनी स्थापन केले आहे. त्यामुळे याचे महत्व आधिक आहे. याठिकाणी रामायणकालीन ऋषी विश्वामित्र यांनी गायत्री यज्ञ केला होता, ज्याची विभूती अजुनही बघावयास मिळते. या स्थानास विश्वामित्र ऋषींची तपोभुमी म्हणून संबोधले जाते. यास तिर्थक्षेत्र प्रयाग म्हणून संबोधले जाते. जळगाव पासून हे क्षेत्र ५० किमी अंतरावर आहे. प्राचीन काळी दशरथ राजाचा मृत्यू झाल्यानंतर प्रभुरामचंद्र वनवासात असल्याने पित्याचे पिंडदान रामेंश्वर या स्थळी केल्याची आख्यायीका आहे. या तपोभुमीत प्रभुरामचंद्राना भगवान शंकराने प्रकट होऊुन दर्शन दिले अशी आख्यायीका आहे. रामेश्वर येथील

शिवलिंग स्वयंभु आहे. या मंदीराचा जिर्णोध्दार अहिल्याबाई होळकर यांनी केला होता. तत्पुर्वी हे मंदीर हेमाडपंथी असावे असा कयास आहे. या ठिकाणी श्रावण महिन्यात मोठी यात्रा भरते. मौजे पळसोद येथील रामेश्वर मंदीर हे तीन नदयांच्या संगमावर असल्याने लांबून भावीक द र्शनासाठी येतात. दररोज सुमारे २०० ते ३०० भावीक व दर सोमवारी साधारणत: १००० भावीक, श्रावण सोमवारी १०००० पर्यंत भावीक येथे येत असतात. पौष महिन्यातील सोमवती अमावस्येला येथे ५०००० च्यावर भक्तमंडळी त्रिवेणी संगमावर स्नानासाठी व दर्शनासाठी येतात.

## ♦ श्रीक्षेत्र चांगदेव ता. मुक्ताईनगर:

हठयोगी संत श्री. चांगदेव यांचे मंदीर मुक्ताईनगरपासून ४ किमी वर पुर्णा व तापी नदीच्या संगमावर आहे. हे हेमाडपंथी मंदीर काळया संगमरवरी शिळा एकावर एक रचून बांधलेले आहे. हे मंदीर अहिल्याबाई होळकरांनी बांधले होते . जेथे या दोन नदयांचा संगम होतो तेथे महादेव मंदीर आहे. चांगदेव मंदीर बरेच प्राचीन असून त्याचा उल्लेख अबुल फजल यांच्या ऐने अकबरीत आहे. मंदीराच्या प्रवेशव्दारावर बाळबोध लिपीतील काही मजकुर आहे. श्री क्षेत्र चांगदेव मंदीर हे जवळ जवळ २५०० वर्षापुर्वीचे हेमाडपंथी मंदीर आहे. पुरातन काळ या मंदीरास लक्ष्मीनारायणाचे मंदीर म्हणत असत. मंदीराजवळून वाहत असलेल्या तापी व पुर्णा नदयांना पुर्वी अनुक्रमे चंद्रकन्या व सुर्यकन्या अशी नावे होती. या दोन्ही नदयांच्या पवित्र संगमाची जागा म्हणजे आताचे चांगदेव या ठिकाणी चांगदेव महाराजांनी १४०० वर्षे तपश्चर्या केली. याच लक्ष्मीनारायणाच्यामंदीरात नंतर श्री चांगदेव महाराजांच्या लाल शेंदराच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. ही मुर्ती स्वयंभू बोलल्या जाते.

चांगदेव मंदीराच्या बाहेर गरूडाची मूर्ती आहे. याच गरूडावरून श्री. महाराजांनी पृथ्वी भ्रमण केलेले आहे. चांगदेव हे मरूजगणाचे (इंद्राचे) अवतार होते. चांगदेव मंदीर हे सहा महिन्याच्या रात्रीत बांधून पुर्ण केलेले आहे. चांगदेव मंदीरापासून जवळच परशुरामाने बाण मारलेला असून पुर्वी येथे गोमुखातून पाणी वाहत असे त्याला गंगधारचा नाला असे नाव आहे. आता सदरची जागा हतनुर बॅकवॉटर मध्ये गेलेली आहे. पुर्वी संगमाजवळच्या वाळवंटात अहिल्याबाई होळकर यांनी मंदीर बांधलेले आहे. परंतु हतनुर जलाशयात सदरचे मंदीर पाण्याखाली गेलेले आहे. येथे साधारणत: वर्षभरात १५०००० ते २००००० पर्यटक येतात.

## ♦ श्री क्षेत्र मेहूण ता. मुक्ताईनगर :

संत निवृत्ती, ज्ञानेश्वर, सोपान व मुक्ताई ही चारही भांवडे समाधी घेण्याकरिता सर्व संत चांगदेव महाराजांबरोबर निघाले. सर्वात पहिले श्री संत ज्ञानेश्वर महाराजांनी कार्तीक वदय त्रयोदशीला क्षेत्र आळंदी येथे समाधी घेतली. तेथून पुढे सासवडला संत सोपानकाकांनी समाधी घेतली. पुढे पुणतांब्याला चांगदेव महाराजांनी समाध्री घेतली. तेथून संत मुक्ताबाईना समाधी घेणेसाठी सर्व मंडळी व भक्तगण तापीतिरी जेथे परशुरामाने बाण मारलेल्या अशा पुर्वीच्या महतनगर, महतग्राम (आताचे मेहूण) गावी आले. येथेच मार्तंड ऋषींनी तपस्या केलेली असून पुरातन सोमेश्वर मंदीर आहे. याच मंदीरात तापीतिरी आकाशात मेघ दाटून आले. वादळ वाहू लागले.आणि लख्ख विज कडाडली त्यात संत मुक्ताई अंर्तधान पावल्या.

या घटनेच्या सुमारे सहाशे वर्षानंतर वै.ह.भ.प.श्री बळीरामबुवा चाळीसगांवकर व वै. ह. भ. प. विठ्ठलबुवा उत्राणकर यांनी संत नामदेवांच्या अभंगाच्या आधारे तापी तीरावर सोमेश्वर पादुकांची स्थापना केली. सन

१९९४ साली वै. ह.भ.प. रामभाऊ टोपडे व वै.गं. बंकंटस्वामी यांनी तापीतिरी मुक्ताईचे मंदीर बांधून पुर्ण केले जे मंदीर आज पाण्यात आहे. त्यानंतर हतनूर प्रकल्पामुळे सदरच्या मंदीरासाठी पुरातन गावठाणाची जागा निश्चित करून त्या ठिकाणी आश्विन शुक्ल प्रतिपदा श्री. संत मुक्ताई जयंती दिनी सन १९८० साली प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. अश्विन शुध्द प्रतिपदा ते नवमी नवरात्र श्री मुक्ताई जयंती सोहळा, मिती माघ वदय दशमी, मिती वैशाख वदय प्रतिपदा ते व्दादशी श्री मुक्ताईतिरोभूत सोहळा, त्रैवार्षिक पुरोषोत्तम मास महोत्सव, मासीक वदय एकादशी वारी या कालावधीत येथे यात्रा भरते. भुसावळपासून सुमारे २० किमीवर मुक्ताईनगर जवळ कोथळी येथे संत मुक्ताबाईचे जुने नवीन मंदीर आहे. तेथूनच जवळ एदलाबादला संत मुक्ताबाईचे नवीन मंदीर बांधण्यात आले आहे. संत मुक्ताबाईभोवती एक अदभूत रम्यतेचे वलय आहे. मुक्ताबाईच्या इतर भावडांनी समाधी घेतली पण संत मुक्ताबाई मात्र नाहीशी झाली असे मानतात. ती फिरत फिरत हठयोगी चांगदेव यांच्या तपोभूमीत आली होती. इ.स. १२९७ मध्ये वैशाख शुध्द व्दादशीला ती तेथे असतांना अचानक भर माध्यान्हीला वीज कडाडली आणि त्या झगमगाटात ती अदृश्य झाली. तेथे तिचे जुने मंदीर होते. मुक्ताबाई या बालयोगिनेचे हे स्मारक म्हणून ओळखले जाते. माघ वदय दशमी ते व्दादशी असे तीन दिवस येथे मोठी यात्रा भरते.

## ♦ श्री. क्षेत्र हरताळे ता. मुक्ताईनगर :-

हे तळे त्रेतायुगात दुधुंबी (दुधासारखे) सरोवर होते. स्वर्गाच्या देवी, देवता, अप्सरा, अष्टनायका पृथ्वीवर दुधुंबी सरोवरामध्ये जलक्रीडा करण्याकरिता येत असत. श्रावणबाळ हा आईवडीलांची कावडे घेऊन पैठणवरून काशीला चालला होता. राज्यधुरीमार्गाने जात असतांना भारंब्या डोंगरात दुधुंबी सरोवर आहे असे श्रावणाला माहीत होते. देवी देवतांच्या आंघोळीचे पाणी तीर्थ म्हणून प्राशन करून घेण्याकरीता तो या तलावावर पाणी घेण्यासाठी आला. त्यावेळेस संपुर्ण महाराष्ट्राला दंडकारण्य म्हणत होते. दंडकारण्या राजा दशरथाची भुमी होती. राजा दशरथ हा अयोध्येवरून दुधुंबी सरोवराची पाहणी करण्याकरता व तीर्थ घेण्याकरता पाच पन्नास सैनिकांची तुकडी घेऊन शिकारीचा बहाणा करून तेथे आला. श्रावणबाळ संध्याकाळच्या वेळेस पाणी घेण्याकरिता तलावावर आला. त्याच्या झारीच्या बुडबुड आवाजावरून राजा दशरथाने एखादे श्वापद असल्याच्या संशयाने शबदवेधी बाण सोडला व तो बाण श्रावणाच्या काळजाला येऊन लागला व त्याची हत्या झाली. त्याचे रक्त पाण्यात सांडले , नरहत्या झाली म्हणून दुधुबी सरोवराचे नांव हत्यातळे, हरताळतळे आणि हरताळे असे झाले. रक्त पाण्यात सांडल्यामुळे पाण्याचा दुधासारखा रंग बदलून पाण्याला मुळ रंग प्राप्त झाला.

सुमारे ८५० वर्षापुर्वी याच ठिकाणी श्रीचक्रधर स्वामी यांनी भेट दिलेली आहे. व भोजन घेऊन मुक्काम केलेला आहे. त्या स्थळांना भक्तासह भोजनस्थान ,व्याघ्रभेट व वस्तीस्थान अशी नावे आहेत. त्या ठिकाणी महानुभाव मंदीर सुध्दा आहे. वरतीइ टेकाडावर श्रावणबाळ समाधी व त्यांच्या आईवडीलांची समाधी स्थळे आहेत. या ठिकाणी प्रत्येक पौर्णिमा व चक्रधरस्वामी जयंती महोत्सवाच्या वेळेस यात्रा भरते. साधारणतः वर्षभरात १४ ते १५ हजार पर्यटक येतात. येथे धर्मशाळा आहे.

## ♦ शिवधाम मंदीर रत्नापिप्री ता. पारोळाः

श्री क्षेत्र शिवधामाची निर्मिती अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ महाराज पिठा परंपरेतील संत पुरूष श्री गजानन महाराज यांच्या प्रेरणेने व आशिर्वादाने शिवधाम निर्मितीस सुरूवात झाली. १९८७ साली श्री गजानन

महाराज हे रत्नाप्रिंप्री येथे दत्तमुर्ती प्राणप्रतिष्ठा करण्यासाठी आले होते. कार्यक्रम आटोपल्यानंतर त्यांचे शिष्य श्री वनराज भागवत यांच्या भावाच्या शेतात लहान दत्तमंदीर होते. वनराज भागवत महाराजांना मंदीरात दर्शनासाठी घेऊन गेले तेव्हा महाराज वनराज भागवतांना म्हटले ही समोरची जमीन दिसते ती अतिप्राचीन काळी ऋषीमुनींची तपोभुमी होती. ही भुमी पवित्र पावन आहे. तेथे जगतकल्याणासाठी महान ईश्वरी कार्य होईल व येथे जगातील लोक येऊन त्यांना मनशांती लाभेल. येथे शिवधामाची निर्मिती करावी. जगात अग्निहोत्र प्रचाराचा संदेश द्यावा. आज सगळीकडे प्रदुषण वाढलेले आहे. मनशांती ढळलेली आहे. त्यासाठी अग्निहोत्र उत्तम साधन आहे. कुठलेही केमिकल न वापरता विषारी किटकनाशक यांची फवारणी न करता भरपूर शेणखत वापरुन अग्नीहोत्र पध्दतीने शेती करावी. लोक निरोगी व समाधानी राहतील यासाठी शिवधामाची निर्मिती करावी असे बोलून महाराज श्री.अक्कलकोटच्या परतीच्या प्रवासास निघून गेले. १९८८ साली श्री.गजानन महाराजांनी देह ठेवला. त्यांच्या आदेशावरुन महाराजांच्या शिष्य परिवाराने रत्नापिंप्री येथे ट्रस्ट स्थापन केले. भागवत यांच्या भावाने दिड एकर जमीन दान दिली. आज तेथे भव्य शिवमंदिराची निर्मिती झाली आहे. या शिवधान मंदिरात राज्यातून व राज्याबाहेरुन तसेच अमेरिका, चीन, पोलंड, ऑस्ट्रेलिया व जर्मनी या देशातून भाविक दर्शनासाठी व अग्नीहोत्र शिकून त्यांचे आचरण करण्यासाठी येत असतात. श्री. क्षेत्र शिवधाम हे निसर्गरम्य व मोकळया जागी असून मंदिरातील देवांच्या मुर्त्या मोहक आहेत. मंदिराचे बांधकाम दाक्षिणी शैलीत असून मंदिराची कला कुसर अत्यंत मनमोहक आहे. मंदीराचे बांधकाम मद्रास येथील कारागिरांनी केलेले आहे. महाशिवरात्र हा सर्वात मोठा उत्सव आहे. यात्रेसाठी राज्य, देश व विदेशातील लाखोने भाविक या उत्सवाकरीता येत असतात. संपूर्ण श्रावण महिन्यात हजारोंच्या संख्येने भाविक दर्शन घेतात. गुरुपौर्णिमा, आषाढी, कार्तिकी एकादशी, रामनवमी, जन्माष्टमी उत्सवासाठी भाविकांची मोठया प्रमाणात गर्दी होत असते. महाशिवरात्रीस साधारणतः ७ ते ८ भाविक दर्शनाचा लाभ घेतात. आषाढी, कार्तिकी एकादशीस प्रती पंढरपूर म्हणून भाविकांची श्रध्दा असल्याने २ ते ३ लाख भाविक दर्शनाचा लाभ घेतात. श्रावण महिन्यात १ लाख भाविक येतात तर इतर महिन्यात सरासरी १५ हजार भाविक दर्शनासाठी येतात

## नाटेश्वर मंदीर,कमळजा देवी मंदीर लासुर ता. चोपडा :

लासूर चोपडयाच्या १२.८ किमी वायव्येस आहे. लासूरच्या उत्तरेस नटेश्वराचे प्राचिन कोरीव मोठे दगडी मंदिर आहे. मंदीर पूर्वाभिमुख असून त्यास चोहूबाजुंनी तटभिंत आहे. मंदिराच्या सभागृहात सुंदर कोरीव चार स्तंभ आहेत. यापैकी दोन स्तंभावर वेलबुट्टीचे नक्षीकाम व दोन स्तंभावर सुंदर पोपटाच्या आकृत्या आहेत. गाभारा खोल असून आत महादेवाची पिंड व दोन देवतांच्या संगमरवरी मूर्ती आहेत. गाभा-यावर कळस आहे. सभागृहात गाभा-याच्या प्रवेशव्दाराच्या दोन्ही बाजूस कारीव देवकोष्ठे आहेत. सभामंडपात दोन मोठे व तीन लहान नदी आहेत. सभागृहात उपरोक्त चार स्तंभाशिवाय बारा अर्धस्तंभ आहेत. त्यावर सुंदर वेलबुट्टी कोरली आहे. मंदिरासमोर प्रांगणात अलिकडि बांधलेली दिपमाळ असून तिच्या उजव्या बाजूस दोन नंदी व प्राचीन पिंड आहे. शिवार चार मुर्ती असल्या तरी ओळखता येत नाहीत. मंदिराच्या समोर प्रांगणातच विहिर आहे. आवारात मंदीराच्या दोन्ही बाजूस अलीकडे बांधलेले दोन भव्य सभागृह आहेत. त्याचा उपयोग लग्नकार्यासाठी केला जातो. आवारात उत्तरेस दोन अज्ञात समाध्या असून समोर एक दुर्वाच्य शिलालेखाचा दगड पडलेला आहे. मंदीराच्या मागील बाजूस तटबंदीच्या बाहेर एक जुळी पायविहिर आहे. या संपूर्ण मंदीरास १९९० मध्ये फरसबंदी करण्यात आलेली आहे. येथे धार्मिक विधी, कार्यक्रम करण्यासाठी धर्मशाळा आहे. तसेच जवळच कमळजा देवीचे मंदीर आहे.

## ♦ कंडारी ता. भुसावळ :

पुर्वीचे कंडारी गांव भुसावळमध्ये विलीन करण्यात आलेले आहे. कंडारीस तापी नदीकाठी मुळ हेमाडपंथी बांधणीचे परंतु आता जीर्णोध्दार केलेले कपीलेश्वर महादेव मंदीर आहे. मुळ मंदीर ४.५ मी लांब, ३.६ मी. रूंद व ६ मी. उंच असून त्याचे स्तंभ कोरीव व फार तुने आहेत. सभामंडपाचे छत नवीन असले तरी मुळ सभामंडपाचे कोरीव नक्षीकामाचे दहा स्तंभ व त्यावरील तुळया शिल्लक आहेत. अंतराळातून गर्भगृहात प्रवेश असून गर्भगृहाच्या प्रवेशव्दाराची दगडी चौकटही जुनीच आहे. हे प्रवेशव्दार शिल्पकलेचा एक उत्कृष्ठ नमुना आहे. मंदीराचा जीर्णोध्दार केल्यावर ग्लेझड टाईल्स व ऑईल पेंटमुळे मुळ शिल्पावरील सौंदर्य लोपले आहे. प्रवेशव्दार माथ्यावर गणेशाची प्रतीमा असून उत्तर अंगावर शिव व पार्वतीसह आणखी तीन देवतांची शिल्पपटटीकाआहे. प्रवेशव्दार माथा व उत्तरंगपटओीका यामश्ये महिरपी नक्षी पटटीका आहे. प्रवेशव्दाराच्या चौकटीस दोन्ही बाजुंनी उभ्या यक्ष, किन्नर,गंधंर्व, नृत्यांगना व मानवी शिल्पपटटीका आहेत. मंदीर आवारात आचार्य श्रीचंददेव, हनुमान, लक्ष्मीनारायण, बाबा प्रयागदास समाधी ही देवालये आहेत. थोडया अंतरावर नदीकाठी दगडी बांधणीचे अन्नपुर्णा देवीचे मंदीर आहे. श्रावणातील प्रत्येक सोमवारी व महाशिवरात्रीला भावींकांची गर्दी असते. या ठिकाणी मकर संक्रांतीला कपीलेश्वराची यात्रा भरते.

## ♦ चांदसणी ता. चोपडा :

चांदसणी ता. चोपडा येथील जागृत देवस्थान काळभैरव देवाच्या दर्शनासाठी १ लाखापैक्षा जास्त भावीक येतात. वर्षातून दोन वेळा येथें यात्रा भरते.

## ♦ केकत निंभोरा ता. जामनेर :

इंधासीमाता देवस्थान हे जामनेर तालुक्यातील केकतनिंभोरा येथे फार पुर्वी पासूनचे देवस्थान आहे. सदर देवस्थान एरंडोल नेरी जामनेर या राज्यमार्ग क्र. १८५ पासून ९०० मीटर अंतरावर आहे. या देवस्थानाचे अंतर जामनेर पासून ७.०० किमी, जळगांव शहरापासून ३०.०० किमी व पहूर गावापासून २० किमीवर आहे. इंधासीमाता देवस्थान हे जागृत देवीचे प्राचीन स्थान आहे व दर्शनास येते वेळी मनातील इच्छा पुर्ण होते अशी भावीकांची श्रध्दा आहे. संपुर्ण जळगांव जिल्हयातून भावीकांची गर्दी दर्शनासाठी वर्षभर असते. देवीचे मंदीर हे गावाजवळील १५० मी उंच टेकडीवर असल्याने लांबूनच लक्ष वेधून घेते. इंधासी मातेची यात्रा मकर संक्रांतीच्या वेळेस आठ दिवस यात्रा असते व यात्रेदरम्यान संपुर्ण जळगांव जिल्हयातून ५००० भावीक येतात. नवरात्रीच्या कालावधीमध्ये संपुर्ण १० दिवस भावीक येत असतात.

## ♦ रामझिरा मंदिर, रावत चिंचोल ता. बोदवड :

बोदवड तालुक्यातील कु-हा हरदो ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील शेवगा रस्त्यावरील मोहनगीर बाबांची समाधी असलेले हे पुरातन मंदिर आहे. या ठिकाणी श्रीराम वनवासात असतांना तपश्चर्या करीत असलेल्या रेवतऋषींनी पाणी मागितले असता नकार दिल्याने रामाने बाण मारून पाण्याचे झरे निर्माण केले अशी आख्यायिका आहे. या ठिकाणी दररोज ५० ते ६० भावीक भेट देतात. विशेषत: श्रावण, मार्गशिर्ष , चैत्र, अधिक मास व प्रत्येक श्रावण सोमवारी ४०० ते ५०० भावीक भेट देतात. फाल्गुण महिन्यात मोहनगीर बाबांची पुण्यातिथी साजरी केली जाते. या ठिकाणी भावीक नवस करतात व लग्न लावतात.

## ♦ राऊतझिरा मंदिर ता. बोदवड :

बोदवड तालुक्यातील कु-हा हरदो ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रात हे पुरातन महादेवाचे मंदिर असून त्या ठिकाणी रेवतऋषी यांनी तपश्चर्या केली आहे. या मंदिराचया बाजुस मोठा तलाव असल्याने हे निसर्गरम्य ठिकाण आहे. दर सोमवारी या ठिकाणी भावीक दर्शनासाठी येतात. विशेषत: श्रावण सोमवारी ५०० ते ६०० भावीकांची गर्दी असते. या ठिकाणी सध्या फक्त मंदिर असून भावींकासाठी इतर सुविधा नाहीत.

## ♦ महादेव मंदिर घाणखेडा ता. बोदवड :

बोदवड मलकापूर रस्त्यावर व्याघ्रा व देवनदीच्या संगमावर हे पुरातन ठिकाण असून या ठिकाणी महादेवाचे मंदीर आहे. श्रावण सोमवारी २०० ते ३०० भावीक या ठिकाणी भेट देतात. संतती होत नसल्यास ५ श्रावण सोमवार या ठिकाणी व्रत करावे अशी भावींकामध्ये श्रध्दा आहे. या ठिकाणी खासदार निधीतून सभामंडपाचे काम सन १९९५-९६ मध्ये करण्यात आले आहे. गावाच्या पाणीपुरवठा योजनेतून जोडणी देऊन छोठी पाण्याची टाकी बांधण्यात आली आहे. या ठिकाणीजागे अभावी विकास कामे करण्यास मर्यादा आहेत.

## ♦ पिर बाबा दर्गा उजनी ता. बोदवड :

बोदवड तालुक्यात बोदवड - वरणगांव रस्त्यावर उजनी येथे हजरत खॉजानवाज तुल्ला शावली यांच्या वास्तव्याचे ठिकाण असून बादशाहा जहांगीर यांच्या कालावधीतील आहे. या ठिकाणी दरवर्षी सप्टेबर आक्टोबर महिन्यात उरुस भरतो. त्यावेळी सर्व धर्माचे ३० ते ३५ हजार भाविक उपस्थित असतात. तसेच रज्जब या मुस्लीम महिन्याच्या १५ व १६ तारखेस यात्रा भरविण्यात येते. या ठिकाणी जमिनीतून झ-यांचा उगम असून वर्षभर पाणी येत असल्याने भावीक मोठया प्रमाणावर भेट देतात. या झ-यांचे रूपातर पुढे भोगावती नदीत झाले आहे.

## ♦ हनुमान मंदिर, शिरसाळे ता. बोदवड :

बोदवड शिरसाळे रस्त्यावर शिरसाळे गावापासून १ किमी अंतरावर हे हनुमानाचे मंदिर आहे. या ठिकाणी मंदिराचे बांधकाम मोठे असले तरी मुर्तीवर छत्र नाही. हनुमान जयंतीच्या दिवशी या ठिकाणी मोठी यात्रा भरते. तसेच दर शनिवारी ५०० ते ६०० भावीक भेट देतात. सभागृह व सभामंडप , छोठी पाण्याची टाकी , धर्मशाळा इत्यादी सुविधा करण्यात आलेल्या आहेत.

## ♦ दादाजी धुनीवाले प्रतिष्ठान निमगव्हाण ता. चोपडा :

परमपुज्य स्वामी भक्तानंदजी सन १९४७ सालापासून निमगव्हाण येथे तापी तिरावर अखंड धुनिहवन, इष्टदेव पुजन भजन इत्यादी साधनांव्दारे सत्य सतयुगाचा प्रचार श्रीश्री १००८ इष्टदेव धुनिवाले यांच्या आज्ञेनुसार सुरू केला. श्री. दादाजी धुनीवाले आश्रम नं १ व्दारे भांडूप येथे २ री व अहमदाबाद येथे तिसरी शाखा सुरू करण्यात आली. गुजरात खानदेश सह, मुंबई या ठिकाणी स्वपरीश्रमाने हजारो लोकांना व्यसनमुक्त करून निष्काम सेवेस भाग पाडले. प्रत्येक महिन्याच्या पौर्णिमेस भजन, नामस्मरण हवन व भंडारा महाप्रसाद केला जातो. सदर कार्यक्रमास दरमहा ४०० ते ५०० भावीक येतात. स्वामी रेवानंदजी, स्वामी भक्तानंदजी यांचा पुण्यतिथी उत्सवास १२ ते १५ हजार भावीक येतात. श्री स्वामी भक्तानंदजी, गुरू रेवानंद परमहंस, श्री दादाजी धुनीवाले प्रतिष्ठान या नावाने न्यासाची नोंदणी करण्यात आली. ट्रस्टव्दारा भव्य मंदिर उभारण्यात आलेले आहे.

या आश्रमाव्दारे राबविण्यात येणा-या कार्यक्रमांना उपस्थित राहून हजारो जनसमुदाय व्यसनमुक्ती, कुटुंब नियोजन, समाजस्वास्थ सारख्या अनेक सामाजीक प्रेरणा व ध्यानधारणा, भजन, नामस्मरण , हवन पुजन याव्दारे आध्यात्मिक प्रेरणा घेत आहेत.

**प्रशासकीय यंत्रणा :-** जळगांव जिल्हयात एकुण १५ तालुके असून प्रशासकीय कामे सुलभ होण्याच्या दृष्टीने एकुण ४ महसूल उपविभाग करण्यात आलेले आहेत. त्यांची रचना पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | उपविभागाचे मुख्यालय | उपविभागात समाविष्ट तालुके |
|---|---|---|
| १ | जळगांव | जळगांव, जामनेर, एरंडोल, धरणगांव |
| २ | भुसावळ | भुसावळ, बोदवड, यावल, रावेर, मुक्ताईनगर |
| ३ | पाचोरा | पाचोरा, भडगांव, चाळीसगांव |
| ४ | अमळनेर | अमळनेर, चोपडा, पारोळा |

२००१ च्या जनगणनेनुसार जिल्हयातील एकुण गावांची संख्या १५१९ असून त्यापैकी २८ गावे ओसाड आहेत. जिल्हयात १६ नागरी शहरे असून त्यापैकी एक ठिकाणी महानगरपालीका, १३ ठिकाणी नगरपालीका व दोन जनगणना शहरे आहेत. ग्रामीण विकासाच्या दृष्टीने जिल्हयात गट व स्वतंत्र अशा एकुण ११५२ ग्रामपंचायती अस्तित्वात आहे. ग्रामपंचायतींची एकुण सभासद संख्या ८४६२ असून महानगरपालीकेत एकुण ७४ सभासद व १३ नगरपालींकात एकुण ३४७ सभासद आहेत. जिल्हयात एकुण ११७ पंचायत समिती सभासद असून जिल्हा परिषदेत एकुण ६८ सभासद आहेत.

जिल्हयात शासकीय कर्मचा-यांची संख्या २३६५७ इतकी असून जिल्हापरिषद कर्मचा-यांची संख्या १४६९४ इतकी आहे. महानगरपालीका व नगरपालीकेतील कर्मचारी संख्या ७८९१ इतकी आहे. ( यात रोंजदारी कर्मचा-यांचा समावेश आहे. )

जळगांवला रस्त्याने पोहचायचे असल्यास धुळयापासून ९२ किमी धुळे कलकत्ता राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ वर आहे. जळगांव हे भुसावळ मुंबई रेल्वेमार्गावर भुसावळपासून २८ किमी वर आहे. जवळचे विमानतळ औरंगाबाद येथून १५३ किमीवर आहे. जळगांव सुवर्णनगरी म्हणून ओळखले जात असून येथे राजमल लखीचंद व रतनलाल सी बाफना यांच्या सुवर्णपेढया आहेत. जळगांवमध्ये कल्याणी ब्रेक्स, जैन इरीगेशन, जैन उदयोग समुहाचे विविध कारखाने, रेमंड, एम्को, एमडीएस, कोगटा यांच्या दालमिल इत्यादी उदयोग आहेत. याशिवाय आकाशवाणी केंद्र, वरणगांव येथे ऑर्डन्सस फॅक्टरी आहे.

**लोकसंख्या :-** २००१ च्या जनगणनेनुसार जळगांव जिल्हयाची लोकसंख्या ३६९२६९० इतकी आहे.लोकसंख्येच्या बाबतीत जिल्हयाचा क्रमांक महाराष्ट्रात आठवा लागतो. नागरी क्षेत्रातील लोकसंख्या १०.५३ लाख आहे. नागरी लोकसंख्या एकुण लोकसंख्येच्या २८.६० टक्के आहे. जिल्हयातील एकुण लोकसंख्येपैकी ७१.६० टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात राहते.
१९९१ ते २००१ या दशकात जिल्हयाच्या लोकसंख्येत १५.५३ टक्के वाढ झाली. ही वाढ राज्याच्या २२.५७ टक्के वाढीपेक्षा ०.६९ पटीने कमी आहे. जिल्हयातील ग्रामीण भागातील दशवार्षिक वाढ १३.७० टक्के इतकी असून नागरी भागातील वाढ २०.३६ टक्के आहे.

**लोकसंख्येची घनता :-** महाराष्ट्र राज्याच्या एकुण क्षेत्रापैकी ३.८२ टक्के क्षेत्र व्यापलेल्या जळगांव जिल्हयात २००१ च्या जनगणनेनुसार राज्यातील ३.८० टक्के व्यक्ती राहतात. हेच प्रमाण १९९१ च्या जनगणनेनुसार ४.०४ टक्के इतके होते. २००१ च्या जनगणनेनुसार जळगाव जिल्हयाची लोकसंख्येची घनता दर चौकिमीला ३१३ इतकी असल्याचे दिसून आली तर राज्याचे हेच प्रमाण ३१५ आहे.

**स्त्री पुरूष प्रमाण :-** २००१ च्या जनगणनेनुसार जळगांव जिल्हयात दर हजार पुरूषामागे स्त्रियांचे प्रमाण ९३३ इतके दिसून आले आहे. सदर प्रमाण १९९१ च्या जनगणनेनुसार ९४० इतके होते. महाराष्ट्र राज्याचे स्त्री पुरुष प्रमाण ९२२ इतके आहे.

**अनुसूचीत जाती/जमातीची लोकसंख्या :-** २००१ च्या जनगणनेनुसार जिल्हयातील अनुसूचीत जाती व जमातीची लोकसंख्या अनुक्रमे ६.४४ टक्के व ११.८४ टक्के आहे. महाराष्ट्र राज्यात हे प्रमाण अनुक्रमे १०.२० टक्के व ८.८५ टक्के इतके आहे.

**काम करणा-यांची संख्या :-** २००१ च्या जनगणनेनुसार जिल्हयाच्या एकुण ३६.८३ लाख लोकसंख्येपैकी १५.६४ लाख (४२.४७ टक्के) लोक पुर्ण वेळ काम करणारे होते व २१.१९ लाख लोक (५७.५३ टक्के) काम न करणारे होते.

पुर्णवेळ काम करणा-यांपैकी २१.७४ टक्के शेतकरी, ३४.९६ टक्के शेतमजुर, १६.८७ टक्के सिमांतीक काम करणारे आणि उर्वरीत २६.४३ टक्के इतर व्यवसायात गुंतलेले होते.

**साक्षरतेचे प्रमाण :-** २००१ च्या जनगणनेनुसार जळगांव जिल्हयातील साक्षरतेचे प्रमाण एकुण ७५.४० टक्के इतके असून राज्यात हेच प्रमाण ७६.८८ इतके आहे. जिल्हयातील ग्रामीण भागातील ७२.१० टक्के तर नागरी भागात ८३.६० टक्के व्यक्ती साक्षर असल्याचे दिसून येते. पुरूष व स्त्रिया यांचे जिल्हयातील साक्षरतेचे प्रमाण अनुक्रमे ८५.९० टक्के व ६४.३० टक्के इतके दिसून आले आहे.

**जिल्हा उत्पन्न अंदाज :-** २००३-०४ या आर्थिक वर्षाकरीता जिल्हावार जिल्हा उत्पन्न अंदाज अर्थ व सांख्यिकी संचालनालयामार्फत मार्च २००५ मध्ये प्रकाशीत करण्यात आलेले आहेत.जळगांव जिल्हयाचे चालु किमतीच्या आधारे निव्वळ जिल्हा उत्पन्न ८२८९.५१ कोटी रूपये इतके अंदाजीत करण्यात आले आहे. जळगांव जिल्हयाचे निव्वळ जिल्हा उत्पन्न राज्याच्या एकुण उत्पन्नापैकी २.८२ टक्के इतके आहे.

जळगांव जिल्हयाचे चालु किमतीच्या आधारे २००३-०४ या वर्षाचे दरडोई उत्पन्न २२०५२ रूपये इतके असून राज्याचे दरडोई उत्पन्न २९२०४ रूपये इतके आहे.

क्षेत्रनिहाय जिल्हा उत्पन्नात सर्वाधिक वाटा तृतीय क्षेत्राचा (सेवा) असून तो ६०.३४ टक्के इतका आहे. त्याखालोखाल प्राथमिक क्षेत्राचा वाटा (कृषी व सलग्न कार्य) असून तो २२.५० टक्के आहे. व्दितीय क्षेत्राचा ( उत्पादन ) वाटा १७.१६ टक्के आहे.

एकुण जिल्हा उत्पन्नात कृषी क्षेत्राचा वाटा सर्वाधिक असून तो २०.८२ टक्के आहे.त्या खालोखाल व्यापार, हॉटेल्स व उपहारगृहे क्षेत्राचा वाटा १७.७६ टक्के आहे.

**शिक्षण :-** जिल्हयात प्राथमिक शाळांची संख्या २११८ असून त्यातील शिक्षकांची संख्या ११२४० इतकी आहे. जिल्हयात प्रती शिक्षक विदयार्थी संख्या ३९ असून राज्यात हेच प्रमाण ३६ इतके आहे.

जिल्हयात माध्यमीक व उच्च माध्यमीक शाळांची संख्या ६१४ इतकी आहे

**आरोग्य :-** जिल्हयात ग्रामीण भागात आरोग्य सेवा पुरवण्याकरीता ७७ प्राथमिक आरोग्य केंद्रे, ३० रूग्णालये, १३ ग्रामीण रूग्णालये, ९१ कुटुंब कल्याण केंद्रे कार्यरत होती.